SGM - Minutes - Held on 1st May 26


# HAPPY HOME CO-OP. HSG. SOC. LTD.

REG. NO. TNA(TNA)HSG/TC/6877/94-95

BLDG. NO. D/116 TO D/139, SECTOR-26, VASHI, NAVI MUMBAI - 400705.


दिनांक : ०३/०५/२०२६

## विशेष सर्वसाधारण सभा-इतिवृत्त

हॅप्पी होम सोसायटीच्या इमारतींच्या पुर्नविकास कामासंदर्भात विकासकाची अंतिम निवड करणेसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९(अ) निर्देशन्वये सर्व सभासदांची विशेष सर्वसाधारण सभा श्री. स्वामी विवेकानंद शाळा, सेक्टर–२६, वाशी, नवी मुंबई येथे शुक्रवार दि. ०१.०५.२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेस एकुण ९८ सभासद हजर होते. सदर सभेस निबंधक कार्यालयाकडून प्राधिकृत अधिकारी श्री. निलेश खंडाळकर साहेब हजर होते. त्याचबरोबर संस्थेचे कायदेशीर सल्लागार श्री. संतोष पळसकर आणि प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार (PMC) श्री. केदार साटम हेही उपस्थित होते.

संस्थेचे सचिव श्री. गडुगले यांनी सर्वप्रथम उपस्थिताचे स्वागत केले आणि सभेच्या अध्यक्षपदासाठी श्री. शिवानंद मालेड यांचे नाव सुचविले त्यास श्री.रघुनाथ मावळे आणि श्री. मारूती पाटील यांनी अनुमोदन दिले.

त्यानंतर संस्थेचे सभासद श्री. प्रदिप फडतरे यांनी महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती श्री. शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस, तर श्री. शंकर कांबळे यांनी भारतीय घटनेचे शिल्पकार श्री. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घातले व श्री. धनाजी भोसले यांनी श्रीफळ फोडून पुजा केली.

त्यानंतर संस्थेचे अध्यक्ष श्री. शिवानंद मालेड यांनी सोसायटीच्या नियोजित पुनर्विकास कामासंदर्भात सुरवातीपासून आजपर्यंत करण्यात आलेल्या सर्व कायदेशीर कार्यवाहीची माहिती उपस्थित सभासदांना दिली. त्यानंतर निबंधक कार्यालयाकडून आलेले प्राधिकृत अधिकारी श्री. निलेश खंडाळकर साहेब यांनी पुर्नविकास कामासंदर्भात आतापर्यंत जी कायदेशीर कार्यवाही करणे आवश्यक आहे त्या सर्व कागदपत्रांची तपासणी केली आणि नंतर सभेच्या पुढील

कार्यवाहीसाठी सुचना दिली. सभेचे पुढील कामकाज सुरू होण्यापूर्वी प्राधिकृत अधिकाऱ्यांनी सभेची गणपुर्ती तपासली असता त्यावेळी एकुण ८४ सभासद हजर असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. सदर उपस्थित सभासदांची ओळख पटविण्यासाठी त्यांनी अंदाजे दहा सभासदांची नावे पुकारून त्यांची ओळख पटवून घेतली. एकुण सभासदांचा तपशील पुढीलप्रमाणे

**एकुण सदनिका : ११८**

**सिडकोच्या ताब्यात अद्यापही असलेल्या सदनिका : ०१**

**मयत सभासद (वारसा हक्काच्या प्रतिक्षेत असलेल्या सदनिका : ०४**

**एका व्यक्तीच्या नावे एक पेक्षा जास्त सदनिका असलेले सभासद : ०१**

**सभेसाठी पात्र असलेले एकुण सभासद : ११२**

**सभेसाठी आवश्यक असलेली गणपुर्ती : ७५**

**सभेसाठी प्रत्यक्ष उपस्थित असलेले सभासद : ९८**

संस्थेचे प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार श्री. केदार साटम यांनी सोसायटीच्या नियोजित पुनर्विकास प्रकल्पासाठी प्राप्त निविदामधून शॉर्टलिस्ट केलेल्या अंतिम तीन विकासकांच्या तांत्रिक बोली आणि ऑफर बीड मधील सर्व बाबींचा सखोल अभ्यास करून तुलनात्मक तक्ता आणि मुल्यांकन सारांश (Evaluation Summary) उपस्थित सभासदांना वाचून दाखविला आणि त्यानुसार गुणनुक्रमे प्रथम क्र. पॅराडाईज ग्रुप, द्वितीय क्रमांक सत्यम ग्रुप तर तृतीय क्रमांकावर लखानी ग्रुप असल्याचे सभासदांच्या निदर्शनास आणून दिले.

त्यानंतर कायदेशीर सल्लागार श्री. संतोष पळसकर यांनी गुणांकानुसार प्रथम स्थानी असलेले विकासक पॅराडाईज ग्रुप यांच्या नावास किती सभासदांची पसंदी आहे अशी विचारणा केली असता एकुण ८१ सभासदांनी हात वर करून आणि उभे राहून आपली पसंती दर्शवली तर तीन सभासदांनी नापसंती व्यक्त केली. परंतु नापसंती दर्शवलेल्या ३ सभासदांपैकी १ सभासद श्री. बाबासाहेब जगदाळे यांनी आपला निर्णय बदलून पॅराडाईज ग्रुप या विकासकास पसंती दर्शविली.

# HAPPY HOME CO-OP. HSG. SOC. LTD.

REG. NO. TNA(TNA)HSG/TC/6877/94-95

BLDG. NO. D/116 TO D/139, SECTOR-26, VASHI, NAVI MUMBAI - 400705.

अशा प्रकारे पॅराडाईज ग्रुप या विकासकाच्या ठरावाच्या बाजूने ८२ तर ठरावाच्या विरूध्द बाजुने ०२ सभासद अशी मते पडली.

विकासकांच्या अंतिम निवडीची प्रक्रीया चालू असताना काही सभासद उशिरा उपस्थित झाले त्यांना सुध्दा निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेण्याचा सुचना निबंधक कार्यालयाचे प्राधिकृत अधिकारी श्री. निलेश खंडाळकर यांनी दिल्या. त्यामुळे सदर सभेतील उपस्थित एकुण ९८ सभासद इतकी झाली. त्यापैकी २ सभासद वगळता इतर सर्वांनी पॅराडाईज ग्रुप या विकासकासाठी आपले संमतीपत्र ५०० रूपयांच्या स्टॅम्प पेपरवर लिहून दिले आणि सदर संमतीपत्रे नोटरी करण्यात आली.

सभेच्या शेवटी सभेच्या अध्यक्षांनी आजच्या सभेस जास्तीत जास्त सभासदांनी उपस्थिती दर्शविली त्याबद्दल सर्वांचे आभार व्यक्त केले आणि कार्यकारिणीने आजपर्यंत ज्या पध्दतीने सर्वांना विश्वासात घेवून आणि पारदर्शकपणे कामकाज केले तसेच यापुढेही केले जाईल असे सांगितले. त्यासाठी आपणा सर्वांनी यापुढेही असेच एकजुटीने राहून सहकार्य करावे असे आवाहन केले.

सदर सभेच्या कामकाजाचे सुरवातीपासून शेवटपर्यंतचे चित्रीकरण करण्यात आले आहे.

सभेच्या शेवटी सर्वांनी उभे राहून राष्ट्रगीत गायले आणि सभेची सांगता झाली.

आपला नम्र,

HAPPY HOME CO-OP. HOUSING SOCIETY LTD.
Regd. No. TNA /(TNA)/ HSG/ (TC) 6877/ 94-95

(श्री. भरत गडुगले)
सचिव